वन्यप्राणी हल्ल्यात मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई मंजूर करण्याबाबत.
कै. सुधाकर बापुराव आत्राम, वाहनचालक, वडसा वनविभाग, जि. गडचिरोली.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्र.एफएसटी-०९/२३/प्र.क्र.२२० /फ-४**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :-२२ सप्टेंबर, २०२३

संदर्भ :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एफएसटी-११/२१/प्र.क्र.२४८/फ-४, दि.१२.१०.२०२२.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर) यांचे पत्र क्र.कक्ष-२ (१)/२४३/२०२३-२४, दि.२१.०९.२०२३

**शासन आदेश :-**

संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णय दि.१२.१०.२०२२ अन्वये वन वणवा, वन्यप्राणी हल्ला, वन तस्कर/शिकारी यांच्या हल्ल्यात तसेच वन्य प्राण्यांचा बचाव करताना मृत्यू पावलेल्या/कायमचे अपंगत्व आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार गट-अ ते गट-ड मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा उक्त नमूद कारणामुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या कायदेशीर वारसांना रू.२५.०० लक्ष एवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देय आहे. संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार कै. सुधाकर बापुराव आत्राम, वाहनचालक, वडसा वनविभाग, वडसा, जि. गडचिरोली यांचा दि.१६.०९.२०२३ रोजी वन्य प्राणी हल्ल्यात मृत्यू झाला असल्याने, शासन निर्णय दि.१२.१०.२०२२ मधील परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद अटी शर्तीच्या अधीन राहून रू.२५.०० लक्ष एवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणून त्यांच्या कायदेशीर वारसांना मंजूर करण्यात येत आहे.

२. या प्रयोजनार्थ होणारा खर्च, मागणी क्र.सी-०७-२४०६ वनीकरण व वन्यजीव (योजनेत्तर) प्रशासन व संरक्षण (अनिवार्य) (२४०६ ००९६) (०१) वेतन या लेखाशीर्षातून सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र २०२३०९२२१४२१२१०९१९ असा आहे. सदर शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VINAYAK SHASHIKANT JAKHALEKAR

Digitally signed by VINAYAK SHASHIKANT JAKHALEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4a106d8ae9dc6f9c21243429b8a21e6762994d1ec1f8e4db5efa4d4eb46f5991, pseudonym=74F0E3B58617F3A42D160E23E461C5362EF8CA44, serialNumber=7D6A60D038156E6E790DF15F9D2E7618F71774B3A755DA77C0BDE0FC621C1435, cn=VINAYAK SHASHIKANT JAKHALEKAR
Date: 2023.09.22 14:23:25 +05'30'

**( वि. श . जाखलेकर )**
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर .

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) महालेखापाल (लेखा परीक्षा/अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर.
५) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
७) उप कोषागार अधिकारी, वडसा, ता. वडसा, जि. गडचिरोली.
८) निवड नस्ती (फ-४)